(इंग्रजीत टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद.)

१९९६ -१ - एससीआर - ४७८

श्रीमती रजनीबाई उर्फ मन्नूबाई

वि.

श्रीमती कमला देवी आणि इतर

जानेवारी १२, १९९६

[न्या. के. रामास्वामी आणि न्या. जी. बी. पट्टनायक]

दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ :

*आदेश ३९ नियम १ व २, कलम १५१ - केवळ मालकी हक्क जाहीर करण्यासाठी दावा - दावा प्रलंबित असताना अंतरिम कालीन मनाई हुकूम देण्याचा अधिकार न्यायालयाला आहे- केवळ मालमत्तेच्या मूर्त हक्काविषयी कोणताही वाद नसल्यामुळे उपाय मिळवण्याचा अधिकार प्रभावित होणार नाही - तसेच त्याच्या अंगभूत अधिकारांतर्गत न्यायालय खटला प्रलंबित असेपर्यंत पक्षकारांच्या हक्कांचे रक्षण करू शकते-प्रकरण गुणवत्तेच्या आधारे विचार करण्यासाठी आणि निकाली काढण्यासाठी उच्च न्यायालयात परत पाठविण्यात आले.*

दिवाणी अपील अधिकारिता : १९९६ चे दिवाणी अपील क्रमांक २५२५.

मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या दिनांक २०.१.९३ च्या १९९१ च्या एम.ए.क्रमांक ३३७ मधील न्यायनिर्णय व आदेशावरून.

ध्रुव मेहता, एस. के. मेहता आणि फजलिन अनाम अपीलकर्त्याकरिता.

सुनील गुप्ता, श्री. नारायण आणि संदीप नारायण उत्तरवादीनकरिता.

न्यायालयाचा आदेश पुढीलप्रमाणे पारित करण्यात आला.

अनुमति दिली.

आम्ही दोन्ही बाजूंचे वकिलांचे म्हणणे ऐकून घेतले आहे. विशेष अनुमतीने हे अपील मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या जबलपूर खंडपीठातील एकल न्यायाधीशांनी २० जानेवारी १९९३ रोजी एम.ए.क्र.३३७/९१ मध्ये दिलेल्या आदेशावरून उद्भवले आहे.

अपीलकर्त्याने १९७४ पासून मालमत्तेला स्वत:च्या हक्काने चिरभोगाधिकार मालकी हक्क घोषित करण्यासाठी दावा दाखल केला आणि प्रतिकूल कब्ज्याने त्याचे मालकी हक्क परिपूर्ण केले. त्यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ आणि २ अंतर्गत अर्जही दाखल केला आणि उतरवादीला दावा प्रलंबित असताना त्याचा ताबा इतर कोणास देऊ नये याकरिता मनाई करणारा तात्पुरत्या मनाई हुकमाची मागणी केली. न्यायचौकशी न्यायालयाने हा मनाई हुकूम मंजूर केला, परंतु अपिलावर विद्वान एकल न्यायाधीशांनी आक्षेपित आदेशात तो फिरवला. उच्च न्यायालयाने

असा निष्कर्ष काढला आहे की जेव्हा वादतील अमूर्त हक्का संदर्भात कोणताही वाद नसतो, अधिकार घोषणेचा दावा हा केवळ मालमत्तेचा हक्का संबंधी आहे, परंतु स्वतःला हक्क आहे यासाठी नाही; दिवाणी प्रक्रिया संहिता_आदेश ३९ नियम १ आणि २ चा फायदा लाभ तेव्हाच घेता येऊ शकेल जेव्हा मालमत्ता, त्याचा विषयवस्तू अपव्यय, नुकसान होण्याचा किंवा अन्यथा व्यवहार करण्याचा धोका असेल. कोणत्याही परिणामरूप दिलासा न देता, अधिकारघोषणेच्या स्वरूपाच्या साध्या दाव्यात मालमत्तेच्या संदर्भात कोणताही वाद होऊ शकत नाही कारण वाद मालमत्तेचा नाही तर मालमत्तेच्या संदर्भात मागितलेला हक्क देण्याचा आहे जी स्वत: दाव्यात थेट अंतर्भूत आहे, परंतु वादकालीन आदेशात नाही. परिणामी आदेश ३९, नियम १ व २ अन्वये अंतरिम मनाई हुकूम देणे न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राबाहेर असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. उच्च न्यायालयाने व्यक्त केलेले मत कायद्याने योग्य नाही, असे आमचे मत आहे. केवळ मालकी हक्क जाहीर करण्यासाठीच्या दाव्यात न्यायालयाला आदेश ३९, नियम १ व २ किंवा कलम १५१ अन्वये दावा प्रलंबित असताना अंतरिमकालीन मनाई हुकूम देण्याचा अधिकार आहे.

हे मान्य आहे की, अपीलकर्त्याकडे मालमत्तेचा ताबा आहे. आपल्या ताब्याला धोका आहे, अशी त्याची भीती लक्षात घेता जे घोषणा करून मागितले आहे त्याचा तो हक्कादार ठरेल का, हाच त्याचा एकमेव उपाय असेल. जेव्हा तो आपल्या ताब्याचे रक्षण करण्यासाठी मागणी करतो, तेव्हा तो कायद्यानुसार अन्यथा हक्कदार असेल, तर दावा प्रलंबित असताना त्याला

संरक्षण द्यायचे की नाही, याचा विचार न्यायालयाला करावा लागतो. केवळ मालमत्तेच्या मूर्त अधिकारासंदर्भात वाद नसल्यामुळे तो दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३९, नियम १ आणि २ अंतर्गत उपायाचा लाभ घेण्यास पात्र नाही, असे समजणे आवश्यक नाही. असे असले तरी, हा सुस्थापित कायदा आहे की दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ अन्वये दावा प्रलंबित असताना पक्षकारांच्या हक्कांचे रक्षण करण्याचा अंगभूत अधिकार न्यायालयाला प्राप्त झाला आहे. अशा परिस्थितीत उच्च न्यायालयाने अर्जच दाखल करून घेण्या योग्य नसल्याचे व्यक्त केलेला दृष्टिकोण स्पष्टपणे अवैध आणि चुकीचा आहे. आदेश ३९, नियम १ व २ अन्वये केलेला अर्ज दाखल करून घेण्यायोग्य आहे.

उच्च न्यायालयाने गुणवत्तेच्या आधारे या प्रकरणाचा विचार न केल्याने, गुणवत्तेनुसार या प्रकरणाचा विचार करून ते कायद्यानुसार निकाली काढण्यासाठी हे प्रकरण उच्च न्यायालयाकडे परत पाठविण्यात येत आहे.

उच्च न्यायालयातील अपिल निकालात काढेपर्यंत जैसे थी स्थिती चालूच राहणार आहे.
त्यानुसार अपील मंजूर केले जाते. खर्चा बाबत आदेश नाही.

जी.एन. अपील मंजूर.

**x-x-x-x**

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्याय निर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

**x-x-x-x**